# पुणे जिल्हा परिषद, पुणे

यशवंतराव चव्हाण भवन, वेलस्ली रोड, कॅम्प, पुणे-४११००१

ग्रामपंचायत विभाग, ६ वा मजला

| दूरध्वनी क्रमांक :- ०२०-२६१३१९८४ | www.punezpmkcl.org |
| --- | --- |
| E-mail :- vptpunezp1@gmail.com | |


जा.क्र.जिप/पंचा/आस्था-१२ / ८६ /२०२६ दिनांक:- ०५/०८/२०२६

प्रति,

१) सर्व विभाग प्रमुख
जिल्हा परिषद पुणे

२) गटविकास अधिकारी,
पंचायत समिती.......(सर्व), जि. पुणे

**विषय : "हर घर तिरंगा -२०२६" अभियानांतर्गत दि. ०९ ऑगस्ट २०२६ ते १७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत विविध उपक्रम राबविणेबाबत.**

**संदर्भ :-** या कार्यालयाचे पत्र जा.क्र.जिप/पंचा/आस्था-१२ / ८२ /२०२६, दिनांक:-०४/०८/२०२६

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की , दिनांक- ०९ ऑगस्ट ते १७ ऑगस्ट, २०२६ या कालावधीत "हर घर तिरंगा " अभियानाअंतर्गत विविध कार्यक्रम/उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत संदर्भीय पत्रान्वये कळविले आहे. त्यामध्ये सोबत जोडलेल्या 'प्रपत्र अ' नुसार तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे, सदर उपक्रमांना विविध माध्यमांतून प्रसिद्धी द्यावी, ग्रामस्थांचा जास्तीत जास्त सहभाग सुनिश्चितकरावा.

सोबत जोडलेल्या प्रपत्रातील उपक्रमांचे आयोजन करताना भारतीय ध्वजसंहितेचे काटेकोर पालन करण्याबाबत ग्रामपंचायतींना निर्देश देण्यात यावेत. तसेच उपक्रमांचे सर्व उपक्रमांचे फोटो व व्हीडीओ http://harghartiranga.com या लिंक वर अपलोड करण्यची दक्षता घ्यावी.

**सोबत:- प्रपत्र अ**

**गजानन पाटील (भा.प्र.से)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**पुणे जिल्हा परिषद, पुणे**

Scanned with OKEN Scanner

# पुणे जिल्हा परिषद, पुणे

---

## प्रपत्र- अ

**हर घर तिरंगा अंतर्गत दि. ०९ ते १७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत खालील प्रमाणे सर्व ग्रामपंचायतींमध्ये उपक्रम राबविण्यात यावेत**

| दिनांक | उपक्रम | थोडक्यात रूपरेषा |
|---|---|---|
| ०९ ऑगस्ट | तिरंगा यात्रा | १. गावोगावी तिरंगा ध्वज हातात घेऊन तिरंगा यात्रेचे आयोजन करणे.<br>२.तालुकास्तरावर मुख्य कार्यक्रम आयोजित करणे. |
| १० ऑगस्ट | निबंध व वकृत्व स्पर्धेचे आयोजन | १. गावोगावी प्रत्येक शाळेत निबंध व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करावे |
| ११ ऑगस्ट | तिरंगा मरेथॉन | १. तालुका स्तरावर मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करणे. |
| १२ ऑगस्ट | विद्युत रोषणाई | १. सर्व शासकीय निमशासकीय कार्यालयांमध्ये तिरंगा रंगात विद्युत रोषणाई करावे. |
| १३ ऑगस्ट | तिरंगा रॅली / देशभक्तीपर चित्रपट | १. सर्व घरे, दुकाने व शासकीय कार्यालये व खाजगी आस्थापना येथे ध्वजारोहण करावे<br>२. गावोगावी तिरंगा रॅलीचे आयोजन करावे.<br>३. संध्याकाळी गावोगावी स्मार्ट टीव्ही/प्रोजेक्टरद्वारे देशभक्तीपर चित्रपट दाखविण्यात यावेत. |
| १४ ऑगस्ट | सांस्कृतिक कार्यक्रम तिरंगा प्रतिज्ञा / सेल्फी अपलो | १. सर्व घरे, दुकाने व शासकीय कार्यालये व खाजगी आस्थापना येथे ध्वजारोहण करावे.<br>२. स्वातंत्र्यादिनाच्या पूर्व संध्येस गावात सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करावे.<br>३. संध्याकाळी गावोगावी स्मार्ट टीव्ही/प्रोजेक्टरद्वारे देशभक्तीपर चित्रपट दाखविण्यात यावेत. |
| १५ ऑगस्ट | प्रभातफेरी, शालेय स्पर्धा, बक्षीस वितरण, तिरंगा प्रतिज्ञा, सेल्फी अपलोड | १. सर्व घरे, दुकाने व शासकीय कार्यालये व खाजगी आस्थापना येथे ध्वजारोहण करावे.<br>२. गावोगावी प्रभातफेरी काढावी. |
| १६ ऑगस्ट | देशभक्तीपर चित्रपट | १. संध्याकाळी गावोगावी स्मार्ट टीव्ही/प्रोजेक्टरद्वारे देशभक्तीपर चित्रपट दाखविण्यात यावेत.<br>२. शासनाच्या http://harghartiranga.com वेबसाईटवर जाऊन सेल्फी अपलोड करणे. |
| १७ ऑगस्ट | तिरंगा प्रतिज्ञा / सेल्फी अपलोड | १. संध्याकाळी गावोगावी स्मार्ट टीव्ही/प्रोजेक्टरद्वारे देशभक्तीपर चित्रपट दाखविण्यात यावेत.<br>२. शासनाच्या http://harghartiranga.com वेवसाईटवर जाऊन सेल्फी अपलोड करणे |

Scanned with OKEN Scanner